| शिक्षण संचालनालय<br>(माध्यमिक व उच्च माध्यमिक)<br>महाराष्ट्र राज्य<br>मध्यवर्ती इमारत, डॉ.ॲनी बेझंट मार्ग, पुणे-४११००१ | सत्यमेव जयते<br>महाराष्ट्र शासन | Government of Maharashtra<br>DIRECTORATE OF EDUCATION<br>(Secondary & Higher Secondary)<br>Maharashtra State<br>Central Building, Dr.Annie Besant Road, Pune-1 |
|---|---|---|

w'site : education.maharashtra.gov.in Phone : (020) 2612 0361 e-mail : doecentralize11state@gmail.com

**परिपत्रक**

**क्र.विद्या-ए-१/११.प्रवेश/२०२२/**
**दिनांक-२४/०९/२०२२**

**प्रति,**
**विभागीय शिक्षण उपसंचालक,**
**(मुंबई, पुणे, नाशिक, अमरावती, नागपूर)**

**विषय:- इ.११वी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया २०२२-२३.**
**उर्वरित विद्यार्थ्यांसाठी प्रवेशाची सतत विशेष फेरी/दैनंदिन गुणवत्ता फेरी DMR आयोजित करणेबाबत.**

**संदर्भ:- राज्यस्तर इ.११वी प्रवेश नियंत्रण समितीची VC बैठक दि.१८/०९/२०२२**

राज्यातील मुंबई महानगर क्षेत्र तसेच पुणे, पिंपरी-चिचवड, नाशिक, अमरावती, नागपूर महानगरपालिका क्षेत्रांतील इ.११वी चे प्रवेश केंद्रीय ऑनलाईन पद्धतीने करण्यात येत आहेत. आतापर्यंत तीन नियमित व तीन विशेष प्रवेश फेऱ्यांचे आयोजन करण्यात आलेले आहे. तथापि अजूनही काही विद्यार्थी प्रवेशाचे प्रतीक्षेत असलेचे दिसून येत आहे. विशेष फेरी-२ पासून पुरवणी परीक्षेत उत्तीर्ण झालेले तसेच ATKT सवलत प्राप्त विद्यार्थ्यांना इ.११वी प्रवेशाची संधी देणेत आलेली आहे. तरीही विशेष फेरी-३ अखेर राज्यातील वरील पाच क्षेत्रांत पुढीलप्रमाणे विद्यार्थी अप्रवेशित आढळून आलेले आहेत.

**प्रवेशासाठी विद्यालय मिळू न शकलेले-११४६२, प्रवेश न घेतलेले-१२२२, एकूण प्रवेश न मिळालेले-१२६८४**

वरीलप्रमाणे विद्यार्थी प्रवेशावीना बाकी दिसून येत असलेने त्यांना संधी देणे आवश्यक आहे. तसेच यापूर्वी घेण्यात आलेल्या प्रवेश फेऱ्यांमध्ये अलॉटमेंट देत असतांना केवळ एकच विद्यालय (विद्यार्थी पसंतीनुसार) Allot केले जाते यामुळे प्रत्येक फेरीमध्ये काही विद्यार्थ्यांना त्यांचे गुणवत्तेनुसार आलॉमेंट मिळत नसेलेचे दिसून येत आहे. त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी मिळावी आणि विद्यार्थ्यांना त्यांनी पसंती दर्शविलेल्या विद्यालयात प्रवेशासाठी प्रतीक्षा यादीमधील स्थान समजावे यासाठी पुढीलप्रमाणे दैनंदिन गुणवत्ता फेरी अर्थात सतत विशेष फेरीचे आयोजन करण्यात येत आहे.

**सतत विशेष फेरी - Daily Merit Round (DMR)**

१. **दैनंदिन गुणवत्ता फेरी** ही नावाप्रमाणे दररोज नवीन असेल. त्यासाठी विद्यार्थ्यांनी वेळापत्रकात दिलेल्या वेळेत दररोज अर्ज करणे आवश्यक राहील. अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी एक दिवस मिळेल, त्या दिवसात प्रवेश न घेतल्यास त्या दिवसासाठी दिलेली पसंती रद्द समजली जाईल व पुढील दिवसासाठी त्यांना पुन्हा ऑन्लाईन अर्ज करता येईल.
२. दैनंदिन गुणवत्ता फेरीमध्ये विद्यार्थ्यांने पसंती दर्शविलेल्या प्रत्येक विद्यालयाचे प्रतीक्षा यादीमधील त्याचे स्थान Rank विद्यार्थ्यास पाहता येईल. त्यामध्ये निवड यादी व प्रतीक्षा यादी यांचा समावेश असेल.
३. विद्यालयामध्ये किती जागा रिक्त आहेत तेवढे विद्यार्थी त्या विद्यालयाचे Selected निवड यादीमध्ये समाविष्ट होतील आणि उर्वरित अर्ज केलेले विद्यार्थी Waitlisted प्रतीक्षाधीन असतील.
४. Selected यादीमध्ये समाविष्ट असलेल्या कोणत्याही विद्यालयात विद्यार्थ्यास Proceed for Admission करून प्रवेशासठी जाता येईल. यामुळे विद्यार्थ्यांना एकापेक्षा अधिक विद्यालयात प्रवेशाची संधी मिळू शकेल आणि पसंतीनुसार एकाची स्वत: निवड करु शकेल.
५. दिनांक ३० सप्टेंबर २०२२ पर्यंत सत्र विद्यालयांमधील इ.११वी प्रवेश प्रक्रिया पूर्ण करणेचे लक्ष्य आहे.
६. दररोज पसंती, दररोज सुधारित गुणवत्ता यादी हे या प्रवेश फेरीचे वैशिष्ट्य आहे. विद्यार्थ्यांनी वेळापत्रक समजावून घ्यावे आपला प्रवेश दिलेल्या वेळेत निश्चित करावा.

वरीलप्रमाणे सूचना संबंधितांचे निदर्शनास आणाव्यात. सोबत DMR सतत विशेष फेरीचे तपशीलवार वेळापत्रक संलग्न आहे त्यानुसार आवश्यक कार्यवाही करावी.

MPalkar
**(महेश पालकर)**
**शिक्षण संचालक**
(माध्यमिक व उच्च माध्यमिक)

शिक्षण संचालनालय (मायमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे-१

# इ.११वी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया २०२२-२३

(मुंबई महानगर क्षेत्र तसेच पुणे, पिंपरी-चिचवड, नाशिक, अमरावती, नागपूर महानगरपालिका क्षेत्रांसाठी)

## प्रवेशाचे दैनिक नियोजन

**दैनंदिन गुणवत्ता फेरी** DMR **(सतत विशेष फेरी)**

| वार | दिनांक | दैनिक फेरीसाठी अर्ज करणे | विद्यार्थ्यांसाठी प्रवेशासाठी वेळ | विद्यालयांसाठी अतिरिक्त वेळ | उद्यासाठी अर्ज करणे |
|---|---|---|---|---|---|
| ** | कार्यवाही | अर्ज लॉक करणे | Proceed for Admission | Upload Admission status | Part 2nd unlocked |
| रविवार | 25/09/2022 | * | * | * | |
| सोमवार | 26/09/2022 | * | * | * | सकाळी.10वा पासून |
| मंगळवार | 27/09/2022 | स.08वा पर्यंत | स.10 ते सायं.05 | सायं.06वा पर्यंत | सायं.07वा पासून |
| बुधवार | 28/09/2022 | स.08वा पर्यंत | स.10 ते सायं.05 | सायं.06वा पर्यंत | सायं.07वा पासून |
| गुरुवार | 29/09/2022 | स.08वा पर्यंत | स.10 ते सायं.05 | सायं.06वा पर्यंत | सायं.07वा पासून |
| शुक्रवार | 30/09/2022 | स.08वा पर्यंत | स.10 ते सायं.05 | सायं.06वा पर्यंत | |
| शनिवार | 01/10/2022 | | | | |

सूचना-

१. दैनंदिन गुणवत्ता फेरी अर्थात सतत विशेष फेरी दैनिक गुणवत्तेवर आधारित असेल. निवडलेल्या आणि प्रतीक्षाधीन विद्यार्थ्यांची यादी दररोज सकाळी १० वाजता घोषित केली जाईल. यासाठी विद्यार्थ्यांना दररोज नव्याने अर्ज करावा लागेल.

२. संध्याकाळी ०७ ते दुसऱ्या दिवशी सकाळी ०८वा पर्यंत, दैनंदिन गुणवत्ता यादीसाठी विद्यार्थी अर्ज करू शकतील (विद्यार्थी त्याच्या पसंतीच्या अर्जामध्ये किमान-१ आणि कमाल-१० विद्यालयांची नोंदणी करू शकतील).

३. प्रवेश न घेतलेल्या विद्यार्थ्यांना दुसऱ्या दिवशीच्या गुणवत्ता यादीसाठी वरील वेळेत दररोज अर्ज करावा लागेल. विद्यार्थ्यांची पसंती फक्त त्या दिवसासाठी वैध राहील. दिलेल्या वेळेत विद्यार्थ्याला दररोज त्याचा अर्ज पुन्हा लॉक करावा लागेल.

४. फक्त तेच विद्यार्थी (ज्यांनी दररोज वेळेत फॉर्म लॉक केले आहेत) दुसऱ्या दिवशीच्या गुणवत्ता यादीसाठी विचारात घेतले जातील.

५. सकाळी १० वाजता अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांची निवड आणि प्रतीक्षा यादीतील स्थिती दररोज घोषित केली जाईल. उमेदवारांच्या याद्या कनिष्ठ महाविद्यालयांनाही दाखवल्या जातील.

६. विद्यार्थ्यांची प्रत्येक विद्यालयाच्या यादीतील स्थिती (निवड किंवा प्रतीक्षा क्रमांक) विद्यार्थ्यांना दाखवली जाईल. विद्यार्थी निवड झालेल्या कोणत्याही ज्यु. कॉलेजमध्ये प्रवेशासाठी पुढे जाऊ शकतो. Proceed for admission.

७. सकाळी १० ते ०५वा पर्यंत विद्यार्थी निवडलेल्या विद्यालयात त्यांचा प्रवेश निश्चित करू शकतात.

८. संध्याकाळी ०६वा पर्यंत विद्यालये पोर्टलवर प्रवेशाची स्थिती अपलोड करू शकतात. यानंतर सर्व प्रवेश न झालेले अर्ज मूळ स्थितीत Reset केले जातील आणि दुसऱ्या दिवशी साठी अर्ज करणेस संध्याकाळी ०७ वाजता सुरूवात होईल.

९. रिक्त जागांचा तपशील वेळोवेळी सुधारित होईल. पुढील अर्ज भरणेपूर्वी रिक्त जागांचा तपशील प्रत्यकाने तपासावा.

१०. वेळापत्रकानुसार या वरीलप्रमाणे प्रत्येक कार्यवाहीची दररोज पुनरावृत्ती होईल.

**परवानगी असलेल्या आणि प्रतिबंधित कृती**

| ** | परवानगी दिलेल्या कृती | प्रतिबंधित |
|---|---|---|
| नेहमी सुरु असणार | विद्यार्थी नोंदणी, अर्ज भाग-1 भरणे आणि अर्ज प्रमाणिकरण.<br>कोटा जागा समर्पण, अर्ज तसेच प्रवेश करणे.<br>द्विलक्षी अभ्यासक्रमासाठी अर्ज करणे आणि प्रवेश. | * |
| दिन<br>स.10 ते सायं.06 | प्रवेश- पुष्टीकरण, नकार आणि रद्द करणे. | भाग-2 अनलॉक करता येणार नाही |
| रात्र<br>सायं.07 ते स.08 | भाग-२ पसंती नोंदविणे आणि त्यामध्ये दररोज बदल करणे.<br>पसंती अहर्ज लॉक करा (दररोज अनिवार्य) | * |

पुणे,
दिनांक-२४/०९/२०२२

MPalkar
(महेश पालकर)
शिक्षण संचालक
(माध्यमिक व उच्च माध्यमिक)

Directorate of Education (Secondary and Higher Secondary) MS, Pune-1

# Std.11th Centralised Online Admission Process 2022-23

(Mumbai MMR, Pune & Pimpri Chinchwad, Nashik, Amravati, Nagpur Municipal Corporation areas)

## ADMISSION FIXTURE

## Daily Merit Round (DMR) (Continuous Special Round)

| Day | Date | Apply for waitlist | Admission time for Students | Additional time for Jr Colleges | Apply for next day slot |
|---|---|---|---|---|---|
| ** | Activity | Lock Part-2 | Proceed for Admission | Upload Admission status | Part 2nd unlocked |
| Sunday | 25/09/2022 | * | * | * | |
| Monday | 26/09/2022 | * | * | * | From 10AM |
| Tuesday | 27/09/2022 | Till 08AM | 10AM - 05PM | Till 06PM | From 07PM |
| Wednesday | 28/09/2022 | Till 08AM | 10AM - 05PM | Till 06PM | From 07PM |
| Thursday | 29/09/2022 | Till 08AM | 10AM - 05PM | Till 06PM | From 07PM |
| Friday | 30/09/2022 | Till 08AM | 10AM - 05PM | Till 06PM | |
| Saturday | 01/10/2022 | | | | |

Notes-

1. Daily Merit Round, The Continuous Special Round will be based on the Daily Merit. Selected and waitlisted students list will be declared daily at 10AM. For this one has to apply daily.
2. From 07PM to 08AM next day, students can apply for the daily merit list (A student can enrol minimum-1 and maximum-10 colleges in his / her choice form).
3. For admission every unadmitted student has to apply for next day merit list during above time. His / Her choices will remain valid for that day only. A student has to lock his form daily in the given time.
4. Only those students (who have locked form daily in time) will be considered for the next day merit list.
5. At 10AM applied students' selected and waitlisted status will be declared daily. The candidate's lists will be shown to Jr. Colleges too.
6. His / Her Rank status (Selected or waiting No.) will be shown to students. Student can proceed for admission to any of the selected Jr. College.
7. From 10AM to 05PM students can do proceed for admission to any of the selected college and confirm their admission in the college.
8. Till 06PM Colleges can upload the admission status on the portal. After this all unadmitted forms will be reset and new form submission will start at 07PM, for next day.
9. Vacancy will be revised from time to time. Everyone should check the vacancy before the next application.
10. **These activities will repeat daily as per the fixture.**

**Allowed and Disallowed Activities. (For College ease)**

| ** | Activities Allowed | Disallowed |
|---|---|---|
| Always Allowed | Student Registration & Part-1 Filling and Verification.<br>Quota Seats Surrender, Apply and Admission.<br>Bifocal courses- Apply and Admissions. | * |
| Day 10AM to 06PM | Admission- Confirmation, Rejection & Cancellation. | Part-2 unlock will not be allowed |
| Night 07PM to 08AM | Part-2 Choices filling & updation.<br>Lock the Cohoice form (Mandatory daily) | * |

**Pune,**
**Dt.24/09/2022**

MPalkar

**(Mahesh Palkar)**
Director of Education
(Secondary & Higher Secondary)